# अनुरागिणी

## बा. भ. बोरकर

REFBK-0023640
REFBK-0023640

सुरेश
एजन्सी
पुणे

अनुरागिणी

सुरेश
एजन्सी
पुणे

REFBK-0023640
REFBK-0023640



अनुरागिणी बा.भ.बोरकर

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी,
२०५ शुक्रवार पेठ,
पुणे ४११००२

©
सौ. रुक्मिणीबाई बोरकर
बेती-आल्तु, बार्देश-गोवा

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

प्रथमावृत्ती
सप्टेंबर, १९८२

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
शिव-पार्वती, टिळक रोड,
पुणे ४११०३०

किंमत पंधरा रुपये

माझे
धन्वंतरी सुहृद
डॉ. बी. जी. मुळे, एम्. एस्.
यांस सप्रेम

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| आता माझ्या मना...... | १ | कालची भरती | २४ |
| देवाकारणें | २ | मागणे | २५ |
| असा कसा मी तरुण निरंतर | ३ | अंतरात मग्न असे | २६ |
| उभ्या भारताचा पहारेकरी | ४ | उत्तर | २७ |
| वाहिलीं जिथें फुलें | ६ | शारदे प्राण दे... | २८ |
| वितळतां मुखीचें मळभ | ७ | आव्हान | २९ |
| माझ्या भारद्वाज राजा | ८ | जळत भाजताना | ३० |
| ऐन वसंती | ९ | ऊठ सखी, जाग, जाग | ३१ |
| सुनीत | १० | हरिशी, मन, हरिणी | ३२ |
| अंति आज तव ओठ बिलगले | ११ | पावलों दारीं तुझ्या | ३३ |
| सहस्र नामांनीं आळवितो तुला | १३ | अनुरागिणीस | ३४ |
| तुझ्यामुळें | १४ | कवित्वाहुनी का ? | ३५ |
| सगळे कांही सरतें रे | १५ | सोयरिया | ३६ |
| उरांत आहे प्रीती म्हणुनी | १६ | कोजागरी | ३७ |
| जगायाचें आहे | १७ | छेडुं नको पण भलत्या वेळीं | ३८ |
| आल्यावर राग तुला | १८ | गा गा, असेच गात रहा | ४० |
| मातींमधिं मुरल्याविण | १९ | ग्वाही | ४२ |
| डोळ्यांहुनिही जवळ असुनि तूं | २० | रोषणाई | ४३ |
| दूर जळावी संथ अकेली | २१ | पूजा | ४४ |
| नख लावल्याशिवाय | २२ | फार दिसांनी | ४५ |
| कर धरूनी मज पढवी ना | २३ | केशीं तुझिया फुलें | ४६ |

निद्रानदितीरीं सखि ४७
तुम्ही मुलांनो युद्ध जिंकिले ४८
ज्ञानियाची ओवी
तुक्याचा अभंग ४९
भाससी स्मिताननें ! ५०
रूप विलक्षणचि तुझें ५१
माझ्या दूरस्थ लाडक्यांनो ५२
माझे शब्द ५५
एकलेपणींचा साथी ५६
संसार तुझा फुलताना ५७
मस्ती सरल्यावर ५८
अंगणांतलें ऐश्वर्य ५९
विधिनें फुलें जगीं निर्मिलीं ६०
घाईंतच हें गेलें जीवित ६१
गळण्याआधीं ६२
म्हणा कवी वा ६३
दीस उधळावयाचे ६४
कुळागारांतील उन्हें ६५
पतझडिचा काल ६६
साद ये कुठूनसा ६७
पाऱ्यासम दोन सरी ६८
आयुष्याच्या सायंकाळीं ६९
किति वर्षांनीं ७०
जाईजुई आल्या ७१
जादूगिरी ७२
झडतो सखि पारिजात ७३
जरि पाऊल हें पडतें जडसें ७४
कोरडी तृष्णा उद्यांची ७५
विगत तुझा सहवास सुवास ७६
तुम्हां लखलाभों सोनें ७७
कैकदां मेलों तसा ७८
लोण ७९
काव्य होवो वा न होवो ८०
आत्मकथन ८१
स्वतांत इतक चूर राहिलों... ८२
काव्याक्षरही अक्षर नोहे ८४
मेघशा जाशी तिथें तूं ८५
प्रकाशाचे शब्द ८६
नामरूपावीण हरी ८७
दीक्षा ८८
साऱ्या खिडक्या उघड्या टाकून ८९
सावधान ९०

◎



## आतां माझ्या मना....

आतां माझ्या मना पाहीं मुरडोनी
येथें रडें कोणी आयकेना
आसवांची बूज आहे रे माहेरीं
त्यांचें या बाजारीं काय काम ?
येथें जखमांना झोंबतात माशा
आशांचा तमाशा जीवघेणा
सोसल्याचें जेथें आहे समाधान
तें तुझें निधान बाहीं, लाहीं

१२-१-६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
काव्य
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

## देवाकारणें

देवा कारणें कुढावें देवा कारणें रडावें
देव जोडावा म्हणून स्नेह जाळीत जागावें
देव खावा, देव प्यावा, देव दुःखींही भोगावा
भाव होतां अनावर देव सुखावेगीं गावा
देव गातां देवीं न्हातां धारा ओसंडाव्या नेत्रीं
देव दाटावा सांठावा शुद्ध स्फटिकाच्या गात्रीं
देव अनाम अरूप असा नांवारूपा यावा
कांचेमधील ज्योतशी देव देहीं प्रगटावा

२२–१–६०

## असा कसा मी तरुण निरंतर

असा कसा मी तरुण निरंतर सांगू कैसें तुला
सहज अचानक झांकुन डोळे तिनें चुंबिलें मला

थिजलों, बुजलों, पळतच आलों खालीं वर्गामधें
खुडित ज्योतिचीं फुलें पोचलों परंतु स्वर्गामधें
तेथें न्हाणुनि सुरांगनांनी केली अमृत-तुला
जेव्हां ऐसें सहज लीलया तिनें चुंबिलें मला

त्या रात्रीचें तसें चांदणें जगीं न पडलें कधीं
तशी न उरली पुन्हा कधींही दुथडी जागी नदी
उरांत घुसुनी गळ्यांत घुमली निळी निळी कोकिळा
असे झांकुनी डोळे जेव्हां तिनें चुंबिलें मला

आज मावळे जरी चांदणें, आटत आली नदी
तीच कोकिळा कधितरि येते घुंगुर बांधुन पदीं
गातां ती मग उघडे गात्रीं कुबेरगृहिंची ‘ तिळा ’
तरुण असा मी, जेव्हांपासुन तिनें चुंबिलें मला.

७–४–६०

## उभ्या भारताचा पहारेकरी

कुठेंही कुणा द्रोह अन्याय होवो
तयाचा इथें क्षोभ अन् वेदना
इथें वेधितें स्वप्न उन्मार्गगामी
नव्या संगराची घुमे घोषणा
कणा भारताचा असा सह्य येथें
कधीं मेरु, मंदार, द्रोणागिरी
महाराष्ट्र माझा असा वज्रदेही
उभ्या भारताचा पहारेकरी

इथें रात्रिची ज्योत जागे भवानी
दिसा कष्टतो स्वेदगंगाधर
शिजे ब्रह्मनैवेद्यसें अन्न येथें
तया मंत्रितो वेदवैश्वानर
नद्या या न या भाग्यरेषा उद्यांच्या
झरे तेज त्यांचें घरीं डोंगरीं
महाराष्ट्र माझा प्रतापी विरागी
उभ्या भारताचा पहारेकरी

इथें गर्जते मर्द भाषा मराठी
जिचीं अमृता झोंबती अक्षरें
रसें वेधिते सत्त्वगुह्यार्थ सारे
स्वरें छेदिते अनृताचीं शिरें
इथें देव भक्तास धुंडीत येतो
विटेतून येथें उठे पंढरी

महाराष्ट्र माझा असा भक्तिगाथा
उभ्या भारताचा पहारेकरी.

इथें नांदलें धर्मसाम्राज्य पूर्वीं
उभी आजला राष्ट्रधर्मध्वजा
जगीं स्थापण्या क्रांति-मूल्यें युगाचीं
गजारूढ ही सामराज्य–प्रजा
हिनें खोदिलीं भूतकाळांत लेणीं
पुढें याहुनी दिव्य कारागिरी
महाराष्ट्र माझा महत्स्वप्नद्रष्टा
उभ्या भारताचा पहारेकरी

अशी तापसी शुद्ध स्वातंत्र्यभू ही
शुचिष्मंत चारित्र्य येथें पिके
कधींही कधींही कृतांतापुढेंही
तृणाचाहि माथा न येथें झुके
जयां स्वप्न हें मोहि ते सर्व या रे
करा धन्य येथे कुडी वैखरी
महाराष्ट्र माझा तसा आपुलाही
उभ्या भारताचा पहारेकरी.

१९–४–६०

## वाहिलीं जिथें फुलें

वाहिलीं जिथें फुलें तिथेंच ठेवितों चिरा
स्थापितों तिथेंच मौन वर्षिली जिथें गिरा
गंधवेलशी जिथें विकासली सुखीं कथा
सांगता करी तिथेंच कर्पुरारती व्यथा
अश्रु दोन गाळशील गे इथें कधीं जरी
तेवतील त्यांतुनी निरांजनें चिऱ्यावरी

२२–६–६०

## वितळतां मुखीचें मळभ

वितळतां मुखींचें मळभ तुझ्या सखि सारें
अंगणीं उतरतें सुवर्णपंखी वारें
पर स्पर्शुनि फुलतें मिटलें कवन रुपेरी
आल्हाद-पिसोळें झुलतें थरथरणारें

२३-६-६०

## माझ्या भारद्वाज राजा

माझ्या भारद्वाज राजा अशा पहांटे उठून
चिंब आनंदें भिजून सांग आलास कुठून
तुझ्या येण्यानेंच संपे स्वर्गभूची ताटातुटी
फुटे मेघाच्या ललाटीं स्वर्णकस्तुरीची उटी
सोनपंखांसवें तुझ्या आलें ओळखीचें ऊन
माझ्या सखीच्या मुखींचें ओलें चांदणें पिऊन
कां रे वेळाविसी माना देठ ओठांचा मिटून
खास आलास तू रात्रीं माझ्या फुलाला भेटून
त्याविणें का धुंदावला सोनचाफ्यानें हा वारा
सांग अमृतानें कसा टपटपे पाला चारा
काय आलास सखीचें शील पढून शिकून
खुणाविसी शब्दाविणे शुभ सूचक शकून
गड्या तुझ्यामुळें झालें आसवांचें तीर्थोदक
रोज ये रे असा राजा तिष्ठेन मी एकटक

२५-६-६०

# ऐन वसंती

ऐन वसंतीं कशि ग वाळली जुइची माझी वेल ?
वेणिफणी करताना सखि का भुइवर पडलें तेल ?

कातर वेळीं काय कांपते वाऱ्यावांचून वात ?
निशिगंधाविण गंध–उसासे काय टाकिते रात ?
गालाशीं का झटे काजवा लंपट धीट नटेल ?
ऐन वसंतीं कशि ग वाळली जुइची माझी वेल ?

ग्रीष्मावांचुन काय उमाळे उरीं आगिची लाट ?
तंग होउनी रुततो अंगीं काय चोळिचा कांठ ?
वाटे का तुज भ्रमरकरांनीं अवचित गांठ फिटेल ?
ऐन वसंतीं कशि ग वाळली जुइची माझी वेल ?

पान वाजतां काय जागुनी पाळत करिती नेत्र ?
रात्रीमधुनी चित्रमिथुनपट काय नटवितो चैत्र ?
भिंतीमधुनी कां स्वरमुद्रा भोंवळतात सुरेल ?
ऐन वसंतीं कशि ग वाळली जुइची माझी वेल ?

आंच लागतां हिंडवि का कुणि स्मरचंद्राचे देश ?
स्वप्नकुटिल ये वेष घेउनी का रतिपंडित शेष ?
का तुज सखि त्या चिरपुरुषाचा दुःसह झाला खेळ ?
ऐन वसंती कशि ग वाळली जुइची माझी वेल ?

प्रतिसोमीं सखि सोमसुंदरा वाहुनि येई बेल
गुरुपुनवेला घालुन ये दो वडफांद्यांचा मेळ.
असाच ना तरि छळिल सखे तो, अजुन न टळली वेळ
सांडुं नको पण तेल यापुढें, तुलाहि खूण पटेल

२८–६–६०

## सुनीत

माझी दृष्टि गडे वळे तुजकडे; माझाच का हा गुन्हा?
नाहीं काय कधींच तूं बघितलें स्नेहें वळोनी पुन्हा ?
भोळा मी उघडा, खरी चतुर तूं शब्दांविणें बोलशी
नाहीं शब्दकळेविणें मजकडे विद्या दुजी फारशी

भावां आवर घालवे न म्हणुनी शब्दीं असें गुंफितों
घेशी मागुनि रोज एक कविता हें कौतुकें पाहतों
प्रीती ही कवितेवरीलच असें वाटो कितीही तुला
वाहे गंध जरी, खराच रसिके ! तो का फुलावेगळा ?

राहे प्राण कुडींत बद्ध, पण तो शब्दीं असा मोकळा
बोले स्वप्नविभोर सांध्यघनसा भावें निळा कोवळा
होतां वृष्टिंत त्याचिया खिरुन तूं पंचामृताची नदी
का गे चंद्र बनून मी तुजमधीं आंदोळलों ना कधीं ?

नाहीं अन्य रती सखे हिजविणें या जीवनीं अक्षय
झाले कैक गुन्हे असे तरिहि ती निष्पाप मृत्युंजय

३०–६–६०

## अंति आज तव ओठ बिलगले

अंति आज तव ओंठ बिलगले
गद्यांतुन सिंचित परमामृत
काव्यहि माझें या शुभ सेकीं
झालें गे सखि विस्मित अभिनत

माझ्याहि घरीं माठ दुधाचे
कुंजद्वारिं मधाचे मोहळ
झुकलीं गालीं कितिक पाखरें
अंगावर उडलें यमुनाजळ

सुखांत पण या भुका राहिलों
यशांतही उरलों चिरवंचित
बघतांक्षणिं पण गडे, तुझ्यांतच
कुसुमित आलें गे शुभसंचित

दुधामधाहुन पुष्टितुष्टिकर
शब्दांमधलें सखि गंगाजळ
खळखळलें तृष्णातळ भेदुन
झेलित करिं तृप्तीचें देउळ

न्हाउन जळिं त्या चंद्रज्योतशी
ठेविलेंस गर्भालयिं पाऊल
पूर्वार्जित उजळुनी अचानक
झालें चित्र अजंठा वेरुळ

तपे रतीची करुनि अतिरती
प्रतिभारतिनें केलें स्वागत
तरिहि राहिलिस परा वाणिशी
स्मितसुंदर तूं मूक अकंपित

अदर्पवति तूं रूपरागिणी
नेणसि निज संजीवन-मोहन
साक्ष हवी तर बघ मीनाक्षी
या हृदयांतिल तव मुखदर्पण

रिक्तहस्त नच, मुक्तहस्त तूं
स्वरवर-वर्षिणि स्वातीची सर
मौन उतटुनी फुटतां कंठीं
अधरांतुन झरतें मंत्राक्षर

लौकिकांतल्या भाग्यदेवते !
अलौकिकाचा मी अभ्यागत
अशीच कधितरि कंप पावुनी
अलौकिकांतुन हो सखि जागृत.

२-७-६०

# सहस्र नामांनीं आळवितों तुला

सहस्र नामांनीं आळवितां तुला
तयांना परंतु अतीत तूं
सरूप असून अरूपाची खाणी
मुळीं न मावसी मतींत तूं

कधीं रुसव्यानें कधीं विकल्पानें
शस्त्रें जीव जासी चिरीत तूं
हंसून कधीं वा कुशल पुसून
प्राणीं त्राण येसी भरीत तूं

मन होतां शिळा वर्षूनियां हर्षें
खेळसी जळाचें लळीत तूं
तेंच होतां पण भिजूनिया काला
सृष्टी पेरिसी, त्या मळींत तूं

जेथें जातों तेथें नित्य सांगातानें
दुराव्यांतही गे प्रतीत तूं
मोकळेपणाची रेघ न मोडितां
आवळिसी मला मिठींत तूं

१८–७–६०

## तुझ्यामुळें

खडीसाखरेचा खडा जीव झाला तुझ्यामुळें
खिरे विरे पळ पळ तुझ्या प्रीतीच्या ग जळें
आतां गोडावे वासना दुजें न ये कांहीं मना
रूप चाललें लयाला तुझ्या भाळुनिया गुणा
म्हणे मिठाचा बाहुला सिंधु-ठाव पाहूं गेला
त्याच्या ऐश्वर्याची आली माझ्या जीवनास कळा
तुझ्यांतही नाहीं आतां कुठें शिरावया रीघ
आहें नसून तुझ्यांत तुझ्यामुळें शिगोशीग

१८–७–६०

# सगळे कांही सरतें रे

सगळे कांहीं सरतें रे  हृदय तेवढें उरतें रे
तनु जळल्यावर तेंच जगावर जलधरसें अन् झरतें रे

फुलांतुनी तें द्रवतें रे  फळांतुनी तें स्रवतें रे
टपटपतां तें मृतवत् तृणही सजीव होउनि लवतें रे

व्यथितांस्तव तें श्रमतें रे  निरागसांसह रमतें रे
शिणलेल्यांस्तव सहजसदय तें गीत होउनि घुमतें रे

स्वप्निं सख्या तें निजतें रे  सजल लोचनीं भिजतें रे
हृदय कुणाचें असें आज या हृदयीं माझ्या रुजतें रे

हृदयी येतां भरतें रे  करू नये तें परतें रे
त्या भरतीवर धरतें अत्तर तेंच युगांतरिं तरतें रे

२९-३-६१

## उरांत आहे प्रीती म्हणुनी

उरांत आहे प्रीती म्हणुनी क्षितिजीं दाटे दीप्ती
तिच्या आंतल्या ज्योतीमधुनी स्रवती अमृतगीती
जिणें तियेवर जळतें म्हणुनी झालें त्याचें सोनें
सौंदर्याच्या संमोहानें शब्द सिद्धिनें मोने
विषादडंबर जमतें; तरिही त्यावर चढतो पारा
मलयसुगंधें संवृत होतो अनुतापाचा वारा
शरिराच्या या मातीमधुनी झुरुमुरु झरतें पाणी
क्षणिं या असल्या चुंबुनि जाते स्वप्नांतिल मधुराणी
दंवबिंदूपरि अलगद गळतें हलकें होउनि ओझें
झगमगुनी मग जग हें अवघें होतें माझें माझें

२९–३–६१

## जगायाचें आहे

मरायाचें नाहीं मला जगायाचें आहे
येथें मुलामाणसांत, पानां फुलां कणसांत
उन्हा वाऱ्यापावसांत फुलायाचें आहे
मला वाढायचें आहे
मरायाचें नाहीं मला जगायाचें आहे

अंधाराला आहे येथें प्रकाशाचें भान
प्रकाशामधून येथें विकासतो प्राण
प्राणांतून उसळतें आनंदाचें गान
गानांतून घडे येथें अमृताचें स्नान
त्यांचें बीजगुज मला भोगायाचें आहे
मरायाचें नाहीं मला जगायाचें आहे

युगांचा प्रकाश येथें ज्ञानाच्या दिठींत
उद्यांचे आकाश येतें प्रीतीच्या मिठींत
नक्षत्रांचा लक्षपट उघडे स्मृतींत
घडे विश्वप्रदक्षणा ध्यानाच्या गतींत
त्यांच्या आवेगांत मला रंगायाचें आहे
मरायाचें नाहीं मला जगायाचें आहे

अचेतनामधें येथें रुजवीत जाग
सचेतनांतली वेडी विझवीत आग
जगाचा युगाचा ओला आळवीत राग
उन्हा चांदण्यानें जरा उजळीत मार्ग
स्वप्न त्यांच्या प्राक्तनाचें सांगायाचें आहे
मरायाचें नाहीं मला जगायाचें आहे

१५–५–६१

# आल्यावर राग तुला

आल्यावर राग तुला   माझ्या अनुराग-फुला !
गगनगंध भुवनरंग भिडति तुझ्या मुखविधुला

हेरुनिया नयनखुणा   मुकतों मी सुज्ञपणा
भरुनि हृदय नावरतां तुजविण तरि सांगु कुणा ?

कधिं रामा कधिं भामा   छलनामयि अभिरामा
छळ करिसी त्याचपरी करि गे हांसून क्षमा

१६–५–६१

# मातींमधिं मुरल्याविण

मातीमधिं मुरल्याविण चव नाहीं पाण्याला
विरहानें झुरल्याविण द्रव नाहीं गाण्याला
शरिराच्या तृष्णेविण रस कुठला प्रीतीला ?
पतनाच्या धास्तीविण कस कुठला नीतीला ?
आव्हानाविण असल्या तेज न ये संग्रामा
श्रेयाची श्री न चढे प्रेयाच्या परिणामा
रक्ताचा शाप नरें स्वर्गास्तव झगडावें
हृदयाच्या उःशापें वरवैभव उघडावें
ये, हें सखि मातीचें आश्वासन घेउनि ये
प्रीतीवर विश्वासुन उन्मनमन होउनि ये
ये दिठींत, ये मिठींत, भेट पेट घेत जरा
शत ज्योतींमधुनि करूं मातीचा हेत पुरा

३१–५–६१

## डोळ्यांहुनिही जवळ असुनि तूं

डोळ्यांहुनिही जवळ असुनि तूं नक्षत्रांहुनि दूर
अश्रुहुनिही सदय असुनि तूं हिऱ्याहुनीहि निठूर
जरा जवळुनी उरांत भरिसी विकल गूढ काहूर
दुरावुनी पण छेडिसी नंतर कलाबतूसम सूर

११–६–६१

# दूर जळावी संथ अकेली

दूर जळावी संथ अकेली चंदनचूर्णशलाका
मेजावरती अन् उजळावी निळया विजेची राका
अंधुक भिंतीवर गहरावीं चिनी जपानी चित्रें
झुळकेनें क्षणभर लहरावीं पुष्पसुगंधित पत्रें
ध्वनियंत्रीं झिणझिणत असावी कोमल कातरवीणा
अन् फेनापरि स्मरकवनावर चढत रहावा मीना
कवन थांबतां हिनें मनोरम पदें निनादित यावें
फुलांत सजुनी स्फटिकसुमांतुन स्पेन–पेय आणावें
दो जिवणींचे करून भुंगे स्वाद जोडिनें घ्यावा
डोळ्यांमधला मद उभयांनीं डोळ्यांनीच लुटावा
हिनें म्हणावें ‘ कवन म्हणा ना ! ओळखेन मधुराणी ’
आणि हंसावें देठापासुन फुलीं जमेतां पाणी
कवन गाउनी धुंदपणानें अवचित मी थांबावें
ओठ उघडण्याआधीं हिला अन् पहिल्यापरि चुंबावें

११–६–६१

## नख लाविल्याशिवाय

नख लाविल्याशिवाय फूल मिळूनियां गेलें
कांटा लागल्याशिवाय सल निघूनियां गेलें
गे मी गाळिल्या टिपांचीं तुझ्या उरीं झालीं मोतीं
तुझ्या मुखीं फळलीं गे सर्व जन्मोजन्म नातीं
जीव तोडून साजणी लिही असें जीवघेणें
फेड माणसांच्यासाठीं असें ईश्वराचें देणें
आज सुखावलों सखे ! तुझा आगळा सुवास
पूर्णचंद्राची कळा या माझ्या सोन्याच्या फुलास

१७–६–६१

## कर धरुनी मज पढवी ना

‘ कांहिं लिही ना ! ’ ‘ कांहिं बोल ना ! ’
या ‘ ना ’नें मी अगतिक ना !
काय लिहूं अन् काय बोलुं तें
स्वतः सांगुनी टाकच ना !

ओंठ रसीं हे धुंद असे कीं
फिटेच ना रे निसुटपणा
उठे उरीं जी आंतरवाणी
देउं कसा तिज शब्दपणा ?

माझें स्वरसर्वस्व तूंच रे
शब्दि तुझ्या तर तेंच झरे
तुला कशी शब्दांत धरूं मी ?
मनीं मुखीं किति लाज भरे !

भरे दिगन्तीं लाज साजणा
शब्दिं दिशा मी बांधुं कशी
पिशा ! गंध पदरांत धुंद जे
पशांत ते सावरूं कशी ?

शब्द तुझे मम भावच झाले
भावां श्वासोच्छ्वासपणा
धाग्यावर त्या ओवुं कशी तें
कर धरुनी मज पढवी ना !

१८–६–६१

## कालची भरती

जरि नुरलें आतां मन तव माझ्यावरती
मज कळतें, असते सागरासही सुकती
मन ओलें; तरि गे नाहीं राग असूया
वाळूंत उमटली तुझी कालची भरती

२३–६–६१

## मागणे

जळण्याचें बळ तूंच दिलें रे दे आतां विझण्याचें
कणकण फुलण्याचें बळ दिधलें तसेंच दे झिजण्याचें
आकाशासम धुंद बरसलों रचित दिनान्त दिगंतीं
माध्यान्हासम क्षारोदधि मज पिउं दे शांत निवान्तीं
मत्त चांदणें प्यालों त्यापरि घनतम गिळुं दे आतां
अगणित नक्षत्रांच्या भारें जड होई तों माथा
धुवांधार मी प्रपात झालों जैसा लक्ष स्वरांचा
जाउनि उगमीं भेदूं दे मज स्थिर हिमगिरि मौनाचा
आनंदांकुर होउनि जैसा आलों रूपाकारा
सुटुनी त्यातुन घेऊं दे मज मूळ अरूप निवारा

१६–१०–६१

## अंतरांत मंत्र असे

अंतरांत मंत्र असे अन् नेत्रां चित्र दिसे
रेखाया हृदयाचें रम्य पद्मपत्र असे
स्वरवेडे शब्द धुंद घेती आकाशरंग
कायेविण प्राणाला संतत लावण्यसंग
येते भ्रूभंगवती जाते चुंबून झणीं
अंगांगीं पालवीत जन्मांच्या आठवणी
येतें आकाश घरा घाली अभिषेक धरा
परकें कोणीच नुरे हर्षोत्सव ये बहरा
तृप्तीला काय उणें ? संतोषें मत्त जिणें !
जोंवर सौभाग्य असें, भोगूं चल स्वस्थपणें
मंत्राविण, चित्राविण स्वर्गी तरि काय असे ?
निर्मुन येथेंहि तोच त्यांतच मी डुंबतसें

१२–८–६२

## उत्तर

‘ विसर ’ म्हणाया कधीं तुझें मी स्मरण ठेविलें होतें ?
दिसल्यावर तूं हंसल्यें मी तें मुळांत होतें खोटें
निघताना तूं दरवेळीं जें जमलें डोळां पाणी ?
तें तर हुकमी अस्त्र आमुचें अमोघ बाणावाणी !
आणि लाघवी सर्व वागणें ? ती तर अमुची माया !
हावभाव ते डावच केवळ ठाव खरा छपवाया !
स्वभावतः स्त्री नसलेल्याही भावांची अभिनेत्री
गात्रांनीं जें बोलुन जाते पुसुन टाकिते नेत्रीं
ती सलगी लडिवाळ तुझ्याशीं केली होती ना मी ?
खोलींतिल आरशापुढेंही तशीच करितों आम्ही !
तीं पत्रें, त्या चिठ्याचपाट्या आणि चोरट्या भेटी ?
होती माझी उमेदवारी लिहावयाला गोष्टी !
म्हणुन सांगतें नको यांतलें विसरून जाऊं कांहीं
टाकुन जा हे असे भोंवरे पुढें पुढील प्रवाहीं

२८–७–६३

## शारदे प्राण दे....

शारदे, प्राण दे, शारदे त्राण दे
काचणाऱ्या शिळा शोषण्याचें
पृथ्विचें आर्द्र दे, स्नेह सौहार्द दे
आश्रया आलिया पोसण्याचें

शक्ति दे, युक्ति दे, मक्षिकेच्या परी
सुंदराच्या कळा सोसण्याची
दृष्टि दे, भक्ति दे, बाळकाच्या परी
मंगळाची कळा भोगण्याची

कल्पवृक्षाकडे मागतां तो थके
दे अशी बुद्धि गे मागण्याची
देखणें गे तुझें रूप देखावया
रात्रिची दे धृती जागण्याची

१६–८–६३

## आव्हान

छळा, पिडा वा तिरडी काढा आम्ही साहूं पाहूं
गळ्याभोवतीं फास आवळा वेद नवा पण गाऊं
या भूमीचे पुत्र अम्ही रे आकाशा भिडणारे
सप्तसिंधुचें वादळ देखिल भुजांत आवरणारे
आहे अमुचा वंश अनादी कल्पांतातुन वाहे
काळशिरावर पाय ठेवुनी दिगंतराला बाहे
मुखांत अमुच्या मंत्र उद्यांचे युगान्त मंतरणारे
भाव आमुचे तुमच्यास्तवही अंतर अंथरणारे
करांत अमुच्या नव्या युगाच्या पुरुषार्थाची फांदी
उरीं आमुच्या निजल्या आत्म्या जागविणारी नांदी
निरक्षरांच्या मूक भुकांचे आम्ही प्रखर प्रवक्ते
रेखूं त्यांचें प्राक्तन अमुच्या पाजळणाऱ्या रक्तें
निर्भय आम्ही पुरतीं मोडूं दंभाचीं साम्राज्यें
ताऱ्यांवरही स्थापूं इथल्या दीनबंधुंचीं राज्यें
व्यूह रचुनियां पाडा आम्हां जाळा अथवा गाडा
वज्र-धार येईल आमुच्या उरल्या सुरल्या हाडा
तुम्ही न तरी सुतादि तुमचे रडतिल अमुच्यासाठीं
अर्पण होउन तर्पण करितिल युगान्तराच्या कांठीं

२३–३–६४

## जळत भाजताना

पावकरसपरिस तुझा लाव असा प्राणा
ठरव खरा वाणा हा का वृथा बहाणा
वदलों ते शब्द खरे
कीं नकली सर्व हिरे
पटुं दे मज म्हटलें तें गान कीं तराणा
जर माझी प्रीति खरी
धर अशीच ज्योतिवरी
उरतें जें राखेंतुनि तेंच घे प्रमाणा
व्हावें मुखपात्र तुझें
नाहीं सुखसार दुजें
स्त्रवतों रस म्हणुनि असा जळत भाजताना

२५–३–६४

# ऊठ सखी, जाग, जाग

ऊठ सखी, जाग, जाग
कुणि अनाम विहग मधुर आळवितो विरहराग
आंसवांत वहरूनि ये जळलेली काल बाग
फुलति कळे चांदण्यांत लाल सांडती पराग
गंधधुंद डोलतात रत्नरागकान्त नाग
एकलेपणांत सखी चांदणेंहि आग आग
दोन जीव एक जेथ तेथ तृप्तिचें प्रयाग
विसर कलह, विसर दोष, विसर सर्व रोष राग
स्मरुनि सकल जन्म आज ये गे सर्वस्व माग

२५–६–६४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०६६
दा. क्र. २३६७०
काव्य २१/१०/६२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## हरिशी मन, हरिणी

अरुण किरणिं हरित कुरणिं सुभग सहज चरणी
विहरशि जरि विमनपणें हरिशी मन, हरिणी
करुण सजल विकच नयन
उजळित मुखिं स्मितविलयन
थबकुनि कधिं गगनिं बघत उधळिशि मधु भुवनीं
करिशि तरुशिं कधिं अनुनय
थरथरविशि दल किसलय
सुम-परिमल-वलय फुलुनि शिशिर भरे पवनीं
खुडिशि चकित कधिं तृणदल
धरिशि दशनिं गणुनि नवल
अधिकच मग बनुनि मुदित लसलसते धरणी
अवचित कधिं घडुनि स्मरण
करिशि कठिण अधरदमन
फसुनि यमक जणुं रसलय अवघडली कवनीं
नसुनिहि लव परिचय तव
प्रतिपलिं मज नव अनुभव
भव अभिनव दंहिवरसें चमके स्वरकिरणीं

२५-७-६४

# पावलों दारीं तुझ्या

पावलों दारीं तुझ्या केव्हां कसा अन् कोठुनी
नाकळे करुणा कशी काळ्यांत आली दाटुनी
घेरुनी मोहीं मला दिधल्या कितीतरि यातना
त्यांतल्या ज्वाळांत तूं पण जाळिली मम वासना
दुःख तें सुख मानुनी जरि याचिलें नच तूं दिलें
ही व्यथा सुखरूप अक्षय; मृत्युचें सल संपलें
स्वार्थ साधायास जातां घातला तूं मोडता
सोडितां झालास तूं सर्वार्थ माझी सांगता
सांगती न कधीं कुणा हाकेविणें तूं पावसी
मात्र तूं शोधाविणें समयीं सदा मज भेटसी
आपुलें नातें असें वर्णावयास जमेच ना
मी कसाहि असो तुला मजवांचुनी करमेच ना

२५–७–६४

## अनुरागिणीस

अशरीरिणी अनिकेतिनी चिरचंचला सौदामिनी
प्रतिभेचिया स्फटिकांत तूं क्षण बिंबणारी पद्मिनी
असुरां सुरांस अदम्य तूं स्वस्वामिनी निष्कामिनी
संसारसारतिलोत्तमा प्रमदा चराचरगामिनी
चिरविस्मयाचें लास्य तूं स्मरयौवनाचें हास्य तूं
इथल्या सुखांत भुके सदा त्यांचें उदार उपास्य तूं
रंगांतली नवदीप्ति तूं शब्दांतली ऋतशक्ति तूं
रुधिरांतली अनुरक्ति तूं स्वरवेदनेंतिल भक्ति तूं
क्षणनश्वरांतिल बोलकी तूं ईश्वराची पालवी
नवसर्जनाची गर्भमात्रा नित्य लीलालाघवी
चिरजागृतींतिल स्वप्न तूं तृप्तींतली तृष्णा नवी
आत्मोत्सवांतिल माधवी निद्रेंतली वर-जान्हवी
तुज लोकितां ओलांडितों अपमृत्युची मी पायरी
स्थिर अंतरीं होशील का अशरीर मी होतां तरी ?

५–८–६४

## कवित्वाहुनी का ?

कवित्वाहुनी का कवी तो निराळा
भोगितो सोहळा तोच जाणे
मुरलीवांचून काय मुरलीधर
जाहला गोचर स्त्रियां पोरां ?
विश्वीं विश्वंभर मजला फावला
पावला पावला भेट देतो
साऱ्या इंद्रियांचीं फेडितो पारणीं
नाना लाघवांनीं खेंव देतो

२२–४–६६

# सोयरिया

योगियांच्या राया जन्ममृत्युंजया
तशां आर्तांचिया सोयरिया
नाम तुझें कानी वाणी जिवीप्राणीं
वाळिवेपासोनी बळावली
मुसावून ध्यास आला रसत्वास
सुकृत फणस पिकों आला
चेतवली जाग पायां लागे माग
कातळीं तडाग आतुडला
याच वडाछाये पुण्यकर्मोपायें
ओलांडून माये मग्न झालों
स्थिरावली दिठी तुझी गैबभेटी
मीनली त्रिपुटी भ्रूकुटींत
याचसाठीं येणें करावया पेणें
जन्माचें पारणें फेडावया

७–९–६७

## कोजागरी

अजाणतां चित्र जाणितलें तुझें
तेणें माझें ओझें फूल झालें
लाघवानें तुझ्या चाकाटली दिठी
आसक्तिची मिठी सैल झाली
जिवीं गोडावला स्वरूपींचा रस
इंद्रियां पायस जाहला तो
उदेजला चंद्र अंतरी बाहेरी
सर्वांगीं साजिरी कोजागरी
तुडंबल्या पात्रीं कोवळाले दिवे
त्यांत तुझ्यासवें विसावलों

१७–१०–६७

# छेडुं नको पण भलत्या वेळीं

छेड छेड सखि, हक्क तुझा तो
छेडुं नको पण भलत्या वेळीं
काळोखीं उमलतां काजवा
आणिक मनच्या चांदणवेली

उठल्या सुटल्या देउं नको ग
भान मला वाढत्या वयाचें
असेंच आहे धुंदपणानें
वयास चकवित फुलावयाचें

जळणाऱ्या या सिग्रेटीवर
उगीच कां सवतीचा डोळा ?
विझती राखेसवें मागचीं
ज्वाळांतिल तीं वर्षे सोळा

स्मरविव्हल माझ्या कवितांचा
भलता तुजला काच कशाला ?
नातू पणतू सखिसह अपुल्या
खचित याच घेतील उशाला !

भरला पेला बघत गव्हाळी
कां तूं भिंवई चढवुनि दारीं
गद्य जिण्याचे सल वितळूं दे
निथळूं दे जें उले जिव्हारीं

क्वचित साहसें बिचकतेस कां
धोक्याविण का रुची जिण्याला ?
सहज कुणाला संधि मिळे का
मृत्यूलाही लाजविण्याला ?

जीव नसे का कुणावरुनि तरि
ओवाळुनि टाकायासाठीं ?
त्याचमुळे ना पडल्या अपुल्या
येथें जन्मजुगाच्या गांठीं

एकान्तीं वेदान्त नको ग
चिर वश मी तव लावण्याला
छेडिलेंस तूं जरी कितीही
क्षय न माझिया तारुण्याला

१४–९-६८

## गा गा, असेच गात रहा

गा, गा, असेच गात रहा
जीव ओवाळून टिपेंत
मिट्ट काळोखांतील
चंद्रमौळी खोपींत
झोपाळू माडांना जाग आणीत
मिणमिणत्या पणतीसमोर
झांजा टाळयांच्या धुंद लयींत
घिमडीच्या भरगच्च
बुलंद साथीवर

गा, गा, असेच गात रहा
गळ्यांत गळे मिळवून
सुरांच्या मुसळधारांत
कळांचा मळा फुलवीत
भान हरपून

गा, गा, असेच गात रहा
गातां गातां गळ्याबरोबर
काळीज देखील निवळीत ढवळीत
प्रकाशानें आकाश कवळीत

ठार निरक्षर असलांत तरी
कसली खंत ? कसली खंत ?
तुमच्याच गळ्यानें गातात संत
अभंग, पदें, गौळणी, विराण्या

तुमच्या सारख्याच
भोळया, भावुक, आर्त
जन्मजात

गा, गा, असेच गात रहा
गातां गातांच सर्वाक्षर व्हाल
त्यांच्याच सारखे
खोटेपणाला पारखे होऊन
भुकेनें उत्कट
श्रमानें दणकट
आणि श्रद्धेनें चिवट
अशा गाण्यानें गोडावलेल्या
तुमच्या आदिमानव रक्तामधून
उगवणार आहेत
उद्यांचे तुका, चोखा, बंका
बुडणाऱ्या जगाला
अभयाचा अभंग हात
देण्यासाठीं

१४-१-६९

# ग्वाही

भाव झोंबला जिव्हारीं जागलास तूं देव्हारीं
येथें बैसल्या ठायींच माझी पंढरीची वारी
घंटा निनादली कानीं मंत्रें मोहरली वाणी
ओसंडलें तुझ्या पायीं माझ्या अहंतेचें पाणी
डोळां पुंजाळल्या ज्योती पंचप्राणीं पंचारती
माझ्या आंसवांच्या माळा तुझ्या गळ्यांत शोभती
अष्ट सात्त्विक भावांनी रोमरंध्र कोंदाटणी
तूझ्या पूजेंत सर्वेशा सर्व तृष्णांची आटणी
आतां मागायाचें कांहीं प्रभो उरलेंच नाहीं
नाभींतून सुटे गंध श्वासोच्छ्वासीं तुझी ग्वाही

१४-९-६९

## रोषणाई

कां मुली आननीं रोषणाई अशी ?
स्वर्गसम्राज्ञिच्या गौरवें चालशी
श्वास झेलावया देव हे कां थिटे ?
दैत्यही जाहले कां तृणाधाकुटे ?
आणि आकाश हें छत्रसें कां झुके ?
बाहुल्या कां तुझ्या तेळितें कौतुकें ?
अप्सरा घेरिती होउनी कां सरी ?
वर्षिती कां फुलें औषधी वल्लरी ?
कांतिनें हीं कशीं मंद झालीं उन्हें ?
बोलती हें दुधीं देखिलें चांदणें !
नाभिचा नाग कां प्रौढ काढी फणा ?
का म्हणे पाळणा स्वप्न नारायणा ?
तूं सुता, मी पिता ही कथा कालची
तूं जगा अन् मला माउली आजची

१७–८–७१

# पूजा

कमळाक्ष डोंगरावर कनकाची जाळी
नदि नागकातशी तयास वळसा घाली
सखलांत ठेंगणीं झुडुपें, झाडें, जाळ्या
ध्यानस्थ जणूं कीं ससे, अस्वलें, साळी

ढग ऐरावतसे शुभ्र, डोंगरामागें
त्यांतून शुभंकर दिव्य सुदर्शन जागे
फांकून पांखरें कृष्णकमळ पंखांचीं
दीप्तींत धूपसा भूप उलगडूं लागे

जोडून ओंजळी उभीं तृणाचीं पातीं
पानांत उगवल्या गंधांच्या फुलवाती
ही पूजामग्ना प्रातःस्नात प्रसन्ना
जणुं ओलेत्यानें मंत्र पुटपुटे माती

१८–९–७१

# फार दिसांनी

फार दिसांनीं माड पाहिले, सुभग तांबडी माती
हिरवे डोंगर, हिरवे रावे, पिवळी शेतीभाती
मोतीचूर जळाचे ओढे, लाल नळ्यांची वस्ती
वाऱ्यावरच्या पाड्यांची अन् रस्त्यामधली मस्ती
कुठें निळीं मल्मली पल्वलें, सोनसाळचे भारे
कोठे झळझळणाऱ्या गंजी, कोठें वंशपिसारे
कोटें हंसरे तोंडवळे अन् ओळखिचेसे डोळे
तसेंच कोठें गोंड फुलांचे अनाम साधेभोळे
चक्रगतीचा प्रवास सरता काळी फांदी, फांदी
बाळमुखासम चांद उगवला शिंपित ओली चांदी
फार दिसांनीं फिटे पारणें उपासल्या डोळ्यांचें
विरहानेंच दुणावे प्राणीं रूप असें गोव्यांचें

५–१०–७१

## केशीं तुझिया फुलें

केशीं तुझिया फुलें उगवतिल, तुला कशाला वेणी ?
चांदण्यास शिणगार कशाला ? बसशील तेथें लेणीं !
काळोखांतहि नीळ फुलवशिल, चमेलींत वनवाटा
तळमळणाऱ्या पुळणीवर अन् फेनमोगरी लाटा
पहाटशी तूं अमल निरागस, संध्येपरिसहि भोळी
जुन्याच ओळी गुणगुणताना जमतिल सोनपिसोळीं
तुझीं पावलें भिडतां येइल तीर्थकळा पाण्याला
तुझ्या स्वरांच्या स्पर्शें येइल अर्थ नवा गाण्याला
वाळूतिलही तृणपात्याशीं तुझें कोंवळें नातें
तुझ्या दिठीनें क्षितिजींचेंही अभ्र वितळुनी जातें
अशा तुला कां हवें प्रसाधन ? तूंच तुझें गऽ लेणें
तुला पाहिल्यामुळें आमुचें कृतार्थ इथलें येणें !

२८-२-७२

## निद्रानदितीरीं सखि

निद्रानदितीरिं सखी
असतां मी चंद्रधुंद
रातराणि ! श्वास तुझे
झाले सुकुमार गंध

ओझरता स्पर्श तुझा
गमली जणु गार वीज
नखशिखान्त रुणझुणली
वीणेची विणित चीज

दहिंवरसा टपटपला
स्नेह तुझा मुग्ध स्निग्ध
अन् अशब्द हृदयतळीं
नवल उमललें विदग्ध

मिटलेल्या दिठिवरती
मधु मरंद ओघळले
झाले ते नयन तुझे
दोन निळीं शार फुलें

४-४-७२

# तुम्ही मुलांनो युद्ध जिंकिले

तुम्ही मुलांनो युद्ध जिंकिलें
ताठ आमुचा पुन्हा कणा
दांत तोडिले असे तुम्हीं कीं
नाग न काढिल पुन्हा फणा

रेखूं म्हणतां उरिं तुमच्या पण
दिग्विजयाच्या अमर खुणा
त्या ध्याया शिर नमवुनि आल्या
तिलकविना आमुच्या सुना

वीरपत्नि त्या वीरप्रसू त्या
अक्षय त्यांचा उजळ टिळा
चंद्र दिवाकर असती तोंवर
येइल तुमचा वेल फुला

ध्वज तुम्ही उंचविला तो त्या
पडूं न देइल कांहिं उणें
पण तुमच्याविण जिणे आमुचें
यशांत देखिल सुनेंसुनें

२०–४–७२

## ज्ञानियाची ओवी तुक्याचा अभंग

ज्ञानियाची ओवी तुक्याचा अभंग
चित्ताशी सत्संग शाश्वताचा
खचलियां धीर पोळल्यां गारवा
जाणत्यां गोडवा जाणल्याचा
करील का कधीं ऐसें माझी वाणी
पुरवील धणी गांजल्यांची ?
अशा घायें होतों आलों घायकुती
हिंडत हिंपुटी बारा वाटा
देखिला तों कोणी म्हातारा कामाठी
पाठबळा पाटी लाविलेला
बैसला माध्यान्हीं रुखातळीं श्रांत
वाचीत निवांत जीर्ण पान
कौतुकें देखतां माझीच कविता
होती त्याच्या हाता गवसली
बिचाऱ्याला झाली रवंथीचा चारा
उन्हाळ्यांत थारा पाणियाचा
कवीश्वरांनो ! ही तुमचीच कळा
वेल आला फुला सुकताना

२६–४–७२

## भाससी स्मितानने !

भाससी स्मितानने ! घनार्द्र सांज कोवळी
पावसांतली प्रफुल्ल जांभळी सदाफुली
चालिनें तुझ्या सगर्भ गंधडोहळे वना
वृक्षपर्णलोचनांत तुष्ट इष्ट कामना
पावलां झटावयास धांवती निळे झरे
भोंवतीं भ्रमिष्ट व्यस्त दुग्धनील पांखरें
घांस विस्मरून थक्क, नेत्र लाविती गुरें
लक्षिण्या कटाक्ष दक्ष आसपासचीं घरें
कर्णटीकसा खुलून डोल घेइ काजवा
ही अशी तुझ्यामुळेंच कर्पुरारती हवा
निर्जनांत पोंचतांच तूं प्रसन्न चांगुणा
ज्येष्ठ संपला न तोंच श्रावणाचिया खुणा

४–७–७२

## रूप विलक्षणचि तुझें

रूप विलक्षणचि तुझें क्षणचि देखिलें
तेंचि इंद्रचापवर्णि हृदयिं रेखिलें

असतां सौंदर्यविद्ध
होउनि तें शब्दलुब्ध
सलय–स्वरवलयांतुन भुवनिं फांकलें

झिमझिमलें सघन गगन
चमचमलें वन–उपवन
अंकुरलें मृद्रसगुज गंध–माखलें

विश्व अमृतांत चिंब
प्रसवांतुन सुख तुडुंब
प्रतिबिंबीं मूलबिंब सहज मोखलें

२४–७–७२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
काव्य
शाखा (स्थळ प्रत)

# माझ्या दूरस्थ लाडक्यांनो

माझ्या दूरस्थ लाडक्यांनो !
तुमच्या पंखांना पंख फुटावे म्हणून
मीच दिलें तुम्हांला सोडून आभाळांत
आणि त्याच क्षणाला तुटून पडले माझे पंख
अन् होरपळून निघाले हे माझे हात देखील

कदाचित त्याचमुळें संपातीसारखी माझी दृष्टी
घेऊं शकते वेध अनंत योजनांचा
अन् बघूं शकते महोत्सव तुमच्या साहसी कर्तृत्वाचा

दिसतात मला सुस्पष्ट, तेथील वेगवेगळ्या जीवनाचे संदर्भ
तिथली घालमेल आणि धांवपळ,
उच्छृंखल, मोकाट आशाआकांक्षांची.

बघतों मी उत्सुकतेनें, बेवारशी प्रमेयांतून उमलणारें सुकुमार श्रेय,
हिंसेच्या चिखलांतून उगवूं पहाणारें
चिरशांतीचें दुर्दम्य अमृतकमल

इथल्या इथेंच जाणवतात मला तुमचे सगळे ताण,
जेव्हां तुम्ही संकटांना हुलकावण्या देत,
ढोंगसून त्यांना अंगावर घेतां
आणि त्यांची शिंगें पिळून त्यांना उलथून टाकतां
नियतीनें आंखून दिलेल्या बंदिस्त रिंगणांत;

आणि तेव्हां देखील,
जेव्हां चित्रविचित्र रमणींचे मतलबी कटाक्ष

आमिषें लावलेल्या पोलादाच्या जालीम आंकड्यासारखे
तुम्हांला घेरीत असतात तुमच्या विसाव्याच्या जलविहारांत

दिसतें मला, कसे तुम्ही भुकेल्या अवस्थेंत देखील
अंग चोरून टाळतां त्यांची आर्जवें
घरच्या आठवणीनें
तुम्ही एकादा आंकडा गिळलातच
तर माझें ईश्वराकडे एवढेंच मागणें
कीं स्रवावें तुमच्या जठरांत, जळजळतें ॲसिड
तो विरघळवून टाकण्यापुरतें
आणि उसळावें तुमच्यांतून इतकें गंगोदक
कीं त्याच्या वर्षावांत पण्यांगनेचाहि पुण्यांगनेंत
कायापालट व्हावा.

अशी एकादी
आमची सून म्हणून तुम्ही भेटीला आणलीत
तर आम्ही दृष्ट काढून घेऊं तिला घरांत
आणि भरूं तिची ओटी खणानारळांनीं
संतोष-भरल्या अंतःकरणानें

देश, धर्म, भाषा, संस्कृति
काय म्हणून व्हाव्या माणसामाणसांमधील भिंती ?
घराच्या भिंतीप्रमाणें त्या कां नसाव्यात कायमच्या जोडणाऱ्या ?
जन्माबरोबर येणारे हे अपघात,
खरें पहातां आहेत
रसेश्वराच्या विश्वरागाचे लघुदीर्घ आलाप
तुम्ही पकडावी त्यांची अंतर्लय;

तेवढ्यानें तुम्ही कसेहि वागलांत
तरी धन्य धन्य होईल तुमचा माझा युगायुगांचा वारसा !

मग उमगेल तुमच्या सूक्ष्मतम श्रुतींना
श्रीमंतीच्या आलापांत निहित असलेला सनातनाचा विलाप
आणि घडेल तुमच्या तावून सुलाखून निघालेल्या दृष्टीला
ऋताच्या अगम्य किमयेचा अद्‌भुत दृष्टावा,
निर्धनांच्या क्रंदनांतून.

तुमच्यासारख्या सर्व अनिकेत पक्ष्यांसाठीं
ही कामना प्रार्थना मी करतों आहें,
त्यांच्या मातापित्यांची अंतःकरणें सामावून माझ्या रित्या उरांत
आणि मग तुम्हा सर्वांनाच कवटाळण्यासाठीं
दिगंतरांत फांकतात हे माझे हात

आणि काय आश्चर्य !
याच पोळलेल्या हातांतून
उगवतात दवांत भिजलेलीं युगांतराचीं प्रसादफुलें
या शब्दांसारखीं.

८–८–७२

## माझे शब्द

थोर माझ्याहून माझे शब्द हें मी जाणतों
त्राण त्यांचे वेढुनी मी प्राणपंथें चालतों
दाटतां अंधार रानीं तेच होती चूडसे
बूड घोंगावून येतां तेच होडी-शीडसे
तेच वारे पावसाळी पोळतां ज्वाळांत मी
तारणारे हातही ते रोंबता गाळांत मी
तेच होती शक्तिपातीं अमृताची धारसे
दैव घाली वार तेव्हां तेच होती ढालसे
श्रांत वेळीं तेच माथीं चंद्रकांताचे दिवे
त्यांमुळें विश्रामकाळीं श्रेय माझें पालवे
नाकळे कोठून येती ते असे माझ्या मुखीं
देवदूतांसारखे कां राखिती दुःखीं सुखीं
आज होती चौथरा ते माझिया पायातळीं
तेच छत्री होउनी देतील अंतीं साउली

२४-९-७२

## एकलेपणींचा साथी

एकलेपणींचा साथी मज प्रसन्न सागर-कांठ
वहिवाट सरून जगाची माझीच मजसवें गांठ
दिसतांच कुणी हंसरासा मी हर्ष तयाचा गातों
आसवें गाळितां कोणी मी त्यांत मनानें न्हातों
खारव्या गवसुनी जेव्हां कुणि तडिस तडफडे मासा
पावला उपासा म्हणतो; मज व्यथेंत हाच दिलासा
विखरले शिंपले नक्षी सांगती युगांच्या गोष्टी
जाळयांत वाळत्या काळ्या मी कुशल पाहतों कोष्टी
पुळणींतिल होड्यांमधुनी मी तिथेंच बसल्या ठायीं
आठही दिशांशीं येतो साधून शीघ्र शिष्टाई
रेतीतिल बघुनी हिप्पी नागवे उन्हा आशेले
वाटतें चांगले झडले हे शिष्टपणाचे शेले !
अन् तशाच त्यांच्या माद्या करिताना सागरकेली
आरशांतल्याशा गमती मज जिवंत कांचनवेली
सागराचिया सांगाता झणिं सागर होतों मीही
चांदणें उधळितों फेनीं भर माध्यान्हीचे दाहीं

२६–३–७३

# संसार तुझा फुलताना

संसार तुझा फुलताना
तूं त्यांत सुखें खुलताना
बघतो मी लांबून चित्र तें विधुसम मावळताना

तुज शब्द दिला वरताना
तो मोहीं डळमळताना
दिला हात तूं मला नेहमी थकून ढासळताना

मज पचली रविची लाही
ती तुझीच सखि पुण्याई
म्हणुनि असा अतिरसीं नाहतों रसलोलुप असताना

जरि आपण दोन ठिकाणीं
चांदण्यांत फुलतें पाणी
एकजीव आकाशधरित्री परस्परीं खिरताना

१७–४–७३

## मस्ती सरल्यावर

माथ्यावरती होतें ओझें, उरांत होतें गाणें
त्याविण आतां जीवित सारें उदास केविलवाणें
तीं असती तों असते मस्ती जीवन उधळायाची
हात मोटके असून सगळें जग हें कवळायाची
चुरून स्वप्नें सहज काढितों पाण्यावर रांगोळ्या
चांदणसाईसंगें खातों मनचे मांडे पोळ्या
वेळप्रसंगीं प्राणाचाही करितों गोफणगुंडा
संकटांत मोडक्या दळाचा उचलुन धरितों झेंडा
बाण जिव्हारीं भिडतां असतो तोल असा रक्ताचा
की उलथुनि त्या तोच साधितो अचुक वेध वख्ताचा
कोण तोडितो, कोण वेढितो, हिशेब नसतो लेखीं
मस्ती सरल्यावर परि डंखी सलगीची फुलपंखी
चरे पुलाणे जखमहि साधी, खोड जडे झुरण्याची
जाण तयारी ही सरणाची कणकण ओसरण्याची

१६–६–७३

## अंगणांतलें ऐश्वर्य

पानें न कोतनांचीं ज्वाळाच जागत्या या
ओल्या उन्हीं अशा या, या हो जरा पहाया
त्यांच्याच पायथ्याशीं माते विशाळ आळूं
मोती धरी पशांनीं, या हो जरा न्यहाळूं
फांद्या वळीत पाहे ही मोगरी विकासूं
थांबा इथेंच थोडे, लागेल ती उसासूं
वेलीस वाळच्या या हा पांचवाच म्हैना
रुंदावली सुखानें आषाढ लागताना
न्हात्या वित्या पपाया या चार कोपऱ्यांना
त्या ढाळितात छत्र्या पाऊस सांडताना
वृंदावनास वेढी शेवाळ गर्द येथें
दुर्वांकुरीं तयाचें ये मोहरून माथें
निर्नाम औषधींची या अंगणांत दाटी
त्यांच्या सुगंध–मात्रा वारा विमुक्त वांटी
ऐश्वर्य भोगण्या हें कोकीळ धाव घेतो
येथून सर्व गावा सालाप बांग देतो
वृष्टींत सोनवर्खी सृष्टी इथें उधाणे
धा, गा तुम्हीहि सारे या कोकिळाप्रमाणें

११–७–७३

# विधिनें फुलें जगिं निर्मिलीं

विधिनें फुलें जगिं निर्मिलीं
बघतांच त्यां झणिं भाळलों
खुडितांक्षणीं चुरतांच तीं
हिरमुष्टि होउनि वाळलों

झुरतां असा, निशि वाढतां
उडुमंडळीं क्षण पाहिलें
निमिषांत निर्मम चित्त हें
सुखवंत होउनि राहिलें

१२–७–७२

# घाईंतच हें गेलें जीवित

घाईंतच हें गेलें जीवित हां हां म्हणतां दिवस सरे
करावयाचें केलें नाहीं याची आतां खत उरे
नादांतच मी उरलों, पडलों अडल्याच्या सादास उणा
आतां हा अंधार वाढतां तोच पुन्हा आवाज दुणा
स्वतःच्याच चिंतांत न स्मरल्या आप्तेष्टांच्या मुक्या व्यथा
स्मृतिच्या घाटावरती आतां अनुतापाची जळे चिता
वेळेवरती गेलें नाहीं पत्र फूल वा बोल भला
क्षण गेला तो गेला त्याची घडे न आतां स्वर्णतुला !
देवाघरचीं स्वप्नें आलीं तरि न रेखिलीं स्वरें करें
गंगाकाठीं पापी पांगुळ हेंच शेवटीं शल्य खरें
जें गेलें केल्याविण वायां अचूक केवळ तेंच स्मरे
करावयाचें केलें नाहीं याची एकच खंत उरे

६-११-७३

## गळण्याआधीं

गळण्याआधीं सळसळुनी ही रंग उधळिती पानें
आग लागल्यागत राळांचा फाग खेळती रानें
ज्वाळांचे जणुं लोळ झोंबती लाल, पीत, नारिंगी
पर्णांचा वर्णोत्सव घेतो उसळ्या चंगीभंगी
उन्हें सांजची सरीसरींनी त्यांत ओतिती सोनें
झडतीं पानें देखिल होती अमृत भरले दोणे
झडण्याची चाहूल लागतां असा महोत्सव त्यांचा
सण गणुनी पिटितात चौघडा येणाऱ्या मरणाचा
झाडें रानें उंच उडविती पर्णांतून पताका
शाखाशाखांतून टाकिती सुखसंतोषशलाका
म्हणती आतां अपर्ण होऊं, झेलूं हिमसुमवर्षा
हे सामोरे सहर्ष आम्ही नव्या जिण्याच्या स्पर्शा
मीहि जाहलों उत्सुक त्यांसह अपर्ण होण्यासाठीं
रोमांचांतुनि झडती वर्षें रंगत पोटींपाठीं

१२–११–७३

## म्हणा कवी वा

म्हणा कवी वा नका म्हणूं
कां तुमच्यावर रुसूं शिणूं ?
वाजवितो धनुकली तनूची
उपाट तो मज पुरे स्वनू

गोडी त्याची काय कथूं ?
रस जातो उसळून उतूं
मलाहि न कळे कसा केधवां
फुलून येतो कवण ऋतू

तोच पाडितो शब्दसडे
त्यांत अचानक ऊन पडे
अर्थ असो वा नसो तयांना
अपूर्व धन त्यांतुनि उघडे !

बुडून जातों त्यांतच मी
हें सुख येथें काय कमी ?
हुके तुम्हां तें मात्र तेधवां
खरेंच होतों मनीं श्रमी

७–६–७४

## दीस उधळावयाचे

कोंबड्याच्या आरवानें पहांट उघडे
श्रावणाच्या फुंकरानें पारिजात झडे
कत्रणीच्या पत्रीमधें पांखरांची जत्रा
वाती सांवरीत येती फुलजाती सत्रा
सोनवर्खी उन्हामधें चांदवर्खी सरी
वेलीवेलींतून रास खेळतात परी
गर्द चोहींकडे चारा दूध झालें धानीं
कावळ्याच्या डोळ्यापरी जिथें तिथें पाणी
टाकळ्यांच्या दाटीमधें पाकोळ्यांचे थवे
सांज होतां लागतील काजव्यांचे दिवे
असे दीस काय सखी घरीं बसायचे ?
कानीं वारें भरूनिया उधळायाचे !

२२–८–७४

## कुळागारांतिल उन्हें

कुळागारांतिल उन्हें
तसें सखि तुझिया मुखिं चांदणें

बोलाहुनि तव चतुर अबोला
उजव्याहुनिही डावा डोळा
हसण्याहुनिही तुझें साजणी
लबाड रागेजणें

कशीहि बसलिस, कशीहि उठलिस
चाललीस वा कशीहि लवलिस
तरि तूं मादक, त्यांतहि सखि तव
अलसाकुल पहुडणें

तुझ्यांत दिवसा चंद्र उगवता
मध्यरात्रिं उदयोन्मुख सविता
नव नव रूपें प्रतिपळिं फेडिसि
हृदयाचें पारणें

१८–१०–७४

## पतझडिचा काल

वळें वळें कां गासि कवे ?
हृदय तुझें खुलल्याविण त्यांतुन
फुलतिल कैसे सूर नवे ?

पतझडिचा काळ जिवलगा
मागें पडले दिन बरवे
फसले रावे रुसले पांवे
वन आतां नुरलें हिरवें !

कनकरवीची ओढ न कोणा
ज्याला त्याला कनक हवें
चांदण्यास खिजवती पदोपदिं
नटवे फसवे वीज–दिवे

झऱ्यांत चोंचहि नीट बुडेना
वळतिल कैसे विहग-थवे ?
कुणा न पारख खऱ्या सुरांची
सारखेच डावे उजवे !

उचित आज शब्दांहुन मौनच
हरसुनि न झडे जों शिरवें
रुजूं घातल्या तुझ्या व्यथांतुन
पुनश्च वन होइल हिरवें

२२–३–७५

## साद ये कुठूनसा

साद ये कुठूनसा प्रसाद घेउनी तुझा
नाद ये निळा निळा विषाद होउनी तुझा
जाग ये उषःस्रवी प्रकाश घेउनी तुझा
राग रंगराज ये विलास होउनी तुझा
गाढ कोवळ्या जळीं तुझीच नीळ राजते
मोरपारव्या वनीं तुझीच शीळ वाजते
पावतों तिथें तिथें तुझींच पद्मपाउलें
निर्जनीं, जनीं, मनीं तुझींच रत्नराउळें
बोल जे उमाळती तुझीच त्यांत जागृती
जीव हा तुझ्यामुळें कृतार्थ कर्पुरारती

१–६–७५

## पाऱ्यासम दोन सरी

अंगणांत सडसडल्या पाऱ्यासम दोन सरी
सोप्यावर मी इकडे, तूं तिकडे माजघरीं
स्वर्गीचें धन असलें वर्णू ये काय कुणा ?
प्रणयाकुल जलदेवी चुंबुनि झणिं जाय उन्हा !
सोन्याचा क्षण टिपिला घोसाळीं–दुधिणींनीं
आणि कृष्णकमलकान्त कोमल सुमविहगींनीं
या साऱ्यां वर द्याया होतिस तूं जवळ हवी
तूं सखि 'मम' म्हटल्याविण मी का रससिद्ध कवी ?

५–९–७५

## आयुष्याच्या सायंकाळीं

आयुष्याच्या सायंकाळीं सूर मनांतच सनईचे
दूर दिगंतीं मृदु रंगांचे मनमोहन घन मलईचे
कोण वागलें काय वाउगें त्याचा आतां विसर पडे
भलें पुटा जें आलें त्याचे सडेच मागें आणि पुढें
स्नेह पांगले त्या घाटांतिल उंबरठ्यावर गोड उषा
पाणवठ्यावर दिवे वाहती दिवंगतांच्या गाढ निशा
गळला मोहर, तरीहि वाटे पानफुटींतच नवलाई
सावळींत किलबिलती त्यांची जिवास बिलगे जवळाई
बघतों तेथें नटते माझी षोडश-पूजा अधिराणी !
अर्घ्य दुजें कां ? उतरे नयनीं सकलहि सरितांतिल पाणी

८–९–७५

## किति वर्षांनीं

किति वर्षांनीं तुझा बरसला
विद्युद्गति संदेश
अकस्मात मी सचैल भिजलें
विझून गेले क्लेश

यशांत गोंधळलेली असतां
तुझें बिलगलें प्रेम
गमलें भरल्या सभेंत मज तूं
दिलें निरागस क्षेम

आज उमगलें तुलाच कळली
स्त्रीहृदयाची कथा
कळून जळतो त्यासच आम्ही
देउनि जातों व्यथा

विचित्र नियती ! स्वभाव अमुचा
कविहृदयाहुनि गूढ
क्षणांत तोडुन खऱ्या जिवलगा
लावुनि घेतों चूड

क्षय न तुझ्या प्रेमास वत्सला !
कशास मागूं क्षमा ?
भस्मांतहि तुज प्रसन्न बघुनी
हिमीं तृप्त मी उमा

१०-९-७५

## जाईजुई आल्या

थुइ थुइ थुइ जाईजुई नाचत घरिं आल्या
अजुनि कळ्या असुनि खुळ्या हंसत फुलें झाल्या
एक म्हणे दुसरीला, “ गुणि बहिणीबाई
भावाच्या भेटीसम सण दुसरा नाहीं. ”
आणि दुजी बोले, “ मज शकुनाचें वेड
कनकधनांतुन उघडे पाचुचा उजेड. ”
तोंच तिजी उत्तरली उरिं अपुल्या बीज
सात सुन्या वर्षांचें चंद्रोदयिं चीज
चवथी बोले. ‘ आपण कोण कशा वागूं ?
येइल जधिं गगनांतुन मैनेसह राघू ’
उरल्या दोघी वदल्या ओवाळूं डोळे
आसुसल्या बाहूंचे घालुं गळां झेले

* * *

या सुमसुखसंवादें नयन तुझे ओले
गेले दिन पुनरपि सखि भरलेले पेले

१२–९–७५

## जादूगिरी

चिकनळींत ठांसून तिर्फळें काढित होतों बार
दचकुन होतीं उडत पांखरें हवेंत वारंवार
तों मज दिसली फुलांत झुलती अभ्रकपंखी परी
थांबवुनी निज गीत बोलली मधुर कोवळ्या स्वरीं
' देइं जरा ती नळी, दावितें तुला तिचें मी गूज '
फुंकर मारून तिचें बनविलें गोड तिनें अलगूज
वाजवितां मी त्यांतुन आले तिचेच मोहक सूर
ऐकुन जमलीं जवळ पांखरें जीं मज होतीं दूर
प्रत्येकानें मला शिकविलें एक आपुलें गीत
आळवितां तें अपूर्व झरलें बासांतुन संगीत
पुढें एकदां एकाएकीं पिचली माझी नळी
सूर हरपल्यामुळें सदाची सुकली माझी कळी
तरुणपणीं पण मोठी होउन तीच भेटली परी
पुन्हा म्हणाली, ' बघुन हिची घे दुसरी जादूगिरी '
नळी वाळली फुंकुन केली तिनें तिची लेखणी
मला म्हणाली, ' लिहित रहा तूं आसवांत बुडवुनी '
तेव्हांपासुन लिहिलें तें तें सवलें होउनि गीत
गेलें तेथें सतत राहिलें मुक्या कळ्या फुलवीत

१-८-७६

## झडतो सखि पारिजात

झडतो सखि पारिजात
बघ उन्हांत पावसांत
खंत न त्या
सुमनें कुणि उचलिल का
खंत न त्या
वा चिखलीं
भिजत भिजत कुजतिल का

वैशाखीं होता हा
कळकटला मरतुकडा
आज परी पाडितसे
शतहस्तें मुक्तसडा
पावसांत ऊन टिपी
आणि गिमीं ओढि ओल
श्रद्धा किति ही अभंग
आणि धीर खोल खोल

दात्यांचे घेत हात
हातांनीं हाहि रिता
सासुरास निघणाऱ्या
कन्येचा सजल पिता
जाणुनि हें वेंच फुलें
चढण्याआधींच उन्हें
अलगद हुंगीत बसूं
संथपणें तृप्तपणें

१४–८–७६

# जरि पाउल हें पडतें जडसें

जरि पाउल हें पडतें जडसें
मन केविं सखे सुख-कावडसें ?

क्रमलों पथ कंटकयुक्त जरी
ठिबके रुधिरांतुन फूल कसें ?
हृदयोत्कट ते अतिदूर जरी
चिरसन्निधसे गमतात कसे ?

क्षितिजांतिल बिंबति रंग जळीं
मज चुंबिति ते हृदयांत तसे !
परकें कुणि ना जनिं वा विजनीं
गुणरूपगुणें मज लावि पिसें

क्षणसंगहि सुंदर गंधपुडा
शिरिं सांडितसे कलहंस-पिसें
वरसे रव गुंफिति गीत गळां
घुमतां मज दिव्य त्रिलोक दिसे

मग एकटुकेपण तें कुठलें ?
वनजीवनही मम धन्य असें

१७–८–७६

## कोरडी तृष्णा उद्यांची

कोरडी तृष्णा उद्यांची व्यर्थ कीर्तीचे पवाडे
विप्लवाचें भक्ष्य झाले संस्कृतींचे लक्ष वाडे
थोर झाले काय थोडे ? रे कुठें त्यांची कहाणी ?
पूर्व विद्या–विक्रमांची ना कुठें नामोनिशाणी !
पृथ्वीला येतांच वेणा फाटती सारे नकाशे
काळरात्रींतून पुन्हा बाळ ज्योतीचें प्रकाशे
सृष्टिच्या नेमिक्रमीं या कोण तूं अन् कोण मी रे ?
मागुती झाले तसे रे यापुढेंही कैक फेरे !
कीर्तिची कां ओढ ? गोडी जीवनाची काय थोडी ?
नाचऱ्या विद्युल्लतेच्या चाखुं या अष्टांग मोडी
विस्मयें हें नाट्य पाहूं दीप्तिच्या तृप्तींत गाऊं
मातिच्या राहून धर्मी ज्योतिच्या मर्मीत जाऊं

२८–७–७७

# विगत तुझा सहवास सुवास

विगत तुझा सहवास सुवास

या नदिकाठीं पडल्या गांठी
टाकित लाह्या माशांसाठीं
किती बोललों, उधळित बसलों
गुलालसा उल्हास

लिहिलीं कवितांमधुनी पत्रें
सजवित सखि ती अक्षत-चित्रें
विहरत दाहीं, पावसांतही
फुलवियला मधुमास

आल्यावर पण गृहभंजक क्षण
श्रीचरणांशीं गेलों आपण
थिजल्या लोचनिं, कापुर लावुनि
विसार्जिला अभिलाष

जरी विलगल्या अपुल्या वाटा
पुन्हा विलगल्या त्या नदिघाटा
सुख जरि फुलतें तरि सल उलतें
बनुनि अभंग उदास

७–९–७७

## तुम्हां लखलाभो सोनें

तुम्हां लखलाभो सोनें मला माझी माती भली
फोडा हवाबंद डबे पुरे मला पोळी शिळी
ठेवा ग्रहांवरी पाय फस्त करूनिया अब्ज
मला आलिंगू द्या माझ्या त्रस्त पृथ्वीचें गोत्रज
तिच्या साकल्याच्या केल्या तुम्ही लोभापायीं चिंध्या
नेम नाहीं तुम्हांमुळें केव्हां होईल ती वंध्या
तिची फळावया कूस भिजो घामें माझा फाळ
विझो आसवांनीं माझ्या तुम्ही ओतलेला जाळ
व्योमीं उठवा हवेल्या मला नाहीं त्यांचा सोस
शमो खोपींत या थोडा गांजलेल्यांचा आक्रोश
वैभवाच्या शल्यांहून दुःखें दारिद्र्याचीं बरीं
अर्धी झेलावया शिरीं दारीं तिष्ठे कुणीतरी

२२–९–७७

## कैकदां मेलों तसा

कैकदां मेलों तसा मी कैक वेळां जन्मलों
त्यामुळें मी मृत्यूच्या खांद्यावरी रे खेळलों
तो पिता जन्मांतरींचा, तो हितैषी मत्सखा
त्यामुळें रे नित्य गोडी माझिया दुःखासुखा
साथ त्यानें नित्य केली त्यामुळें मी वांचलों
लक्ष देहांतून प्रेमें हिंडलों अन् वाढलों
तो न वंधो ! क्रूर काळा; श्यामसुंदर देखणा
त्याचिया आलिंगनीं रे सत्त्वशीतल प्रेरणा
मी उशी घेतां, सुखें त्याच्या कुशीला झोपतां
जागतां चैतन्य त्याचें या जगाला ओपतों
दुःख देई तो न मृत्यू शृंखला आसक्तिची
ती जळू होते जिवीं त्यानें दिलेल्या शक्तिची
जाणलें जात्याच जें हें बाणलें अभ्यंतरीं
आज देहातीत तेणें राहतों देहीं जरी

५–१०–७७

# लेण

पाणी दांड्यानें हाणितां
त्याची उरे काय खूण
वार झेलूनही तसें
माझें अच्छोदक मन
तुझ्या स्मरणासरशीं
फुटे आंत निळा झरा
तोच आपोआप होतो
डंखां विखारां उतारा
आधी व्याधी उपाधींची
त्यांत निरसती सलें
संसाराच्या पाशांतही
चित्त मोकळें मोकळें
तुझ्या ठायीं जिवा थारा
धीर आधार आसरा
संसार हा मिटे फुले
जसा मोराचा पिसारा
लय लाभल्यानें तुझी
त्रितापांचें तपत्रय
तुझ्या अखंड सांगातें
झालों निश्चित निर्भय
तुझ्या माझ्या आट्यापाट्या
आनंदाच्या क्रीडेसाठीं
माझ्या धांवा पोंचवाया
तुझें लेण तुझ्या हातीं

११–७–७९

# काव्य होवो वा न होवो

काव्य होवो वा न होवो स्वप्न माझें राहुं दे
स्वास्थ्य राहो वा न राहो चित्त माझें गाऊं दे
साथ लाभो वा न लाभो स्नेह माझा वाहुं दे
त्यांतही जो गाळ आहे तोहि आतां जाउं दे
दुःख शोकीं संकटींही बिंब तूझें पाहुं दे
ज्या न वाली त्या जिवाचें शल्य मातें साहुं दे
आंतलें वैकुंठ येथें वाळवंटीं लावुं दे
मृत्युमेघें वोळतां तूं मुक्त सेकीं न्हाउं दे

२३–७–७९

## आत्मकथन

बत्तिशीं कार्तिकी वद्य चतुर्दशीं
आलों येथें कुशी मुक्ताईच्या
पिता भगवंत अष्टगुणवंत
भावांचा श्रीमंत स्वप्नद्रष्टा
तयांची पुण्याई झाली कृपाछत्र
घर पुण्यक्षेत्र संतपदें
बाळपणांतच चोख संतवाणी
तालस्वरीं कानीं वेल्हाळली
शब्द मज झाले कौस्तुभ कुंडल
ज्यांत दिङ्‌मंडल ओलावलें
त्यांच्याशीं खेळतां त्यांनी दिलें क्षेम
निजगुजवर्म सांगितलें
त्यांचिया सांगातें केली पायपीट
त्यांनी माझी वाट रेखाटिली
भाळुनिया वाटे उमाळले शब्द
छंदांचे प्रबंध तेच झाले
आतुडलें तेणें अरत्र परत्र
ज्यांनी विश्ववस्त्र विणिलें हें
त्यांतच देखिला तयांचा विणारी
तेणें मज उरीं आलिंगिलें
शब्दीं मज त्याचा अहर्निश संग
जाहला अभंग बोलिल्याचा

३-७-७९

## स्वतांत इतुका चूर राहिलों....

स्वतांत इतुका चूर राहिलों
जग झालें मज फिकें
स्वरीं आंतल्या रुतलों इतुका
जन वन झालें मुकें

त्याचमुळें का त्रिभुवन सगळें
नवेंच मजला पुन्हा ?
जो देखावा बघतां तो तो
पूर्विंहुनि देखणा

रव पूर्वी जे हुकले चुकले
अपूर्व त्यांतिल श्रुती
अपुल्या लयिच्या विस्मयतेनें
बांधुनि मज ठेविती

झाडांचीही उमगे भाषा
सुमनांचें बोलणें
अनायास मी टिपीत जातों
उन्हांतलें चांदणें

लाटांच्या तालांत ऐकतों
खर्जातिल गायनें
तृणपात्यांच्या ललित नर्तनीं
थेंबांचीं पैंजणें

फुलाफळासम जिवा नि भावा
गंध असे आपुला
पशुशिशुचेंही मानस गवसे
घन तिमिरींही मला

उदयास्तांचीं रंगलिपींतिल
पानें मी वाचतों
नक्षत्रांना बघतां बघतां
विभुत्वांत पोचतों

कसा ना कळे तशा दर्शेतांहि
स्वतांत जातों पुन्हा
स्वरीं आंतल्या रुतून रुजतों
जाग लागल्याविना

२६–७–७९

## काव्याक्षरही अक्षर नोहे

काव्याक्षरही अक्षर नोहे
त्यालाही क्षय आहे
परंतु त्याच्या अमेंतही कुणि
शुक्ल प्रतिपदा पाहे

तीच शशिकला निटिलीं त्याच्या
उटी होउनी राहे
तिचें वाढतें नवलचांदणें
तदक्षरांतुन वाहे

क्षयांतुनी हा असा वृद्धिचा
क्रमे विजेचा धागा
रतिवर त्यावर आळवुनी स्वर
करी महेश्वर जागा

असा दिव्यानें दिवा लाविते
अनादि त्याची ज्योती
वाती त्यांच्या होउनि जळले
धन्यजन्म ते होती

नुरलें अक्षर तरी अनश्वर
ज्योतींतच मी आहें
नवे लागतिल दिवे तयांच्या
द्युतींतुनी मी वाहें

२८-७-७९

# मेघसा जाशी तिथें तूं

मेघसा जाशी तिथें तूं आपणा शिंपीत जा
वांझुट्या झाडांझुडांही नीट गोंजारीत जा
पोळलेला माळ येतां थांब स्नेहानें जरा
स्वप्न पाचूचें तयाचें येउं दे रे मोहरा
स्निग्ध जात्या ही धरित्री ओलिनें गंधप्रसू
सांडतां झेलील तूतें दाटुनी पोटीं हसूं
हो रिता जाशील तेथें, जा जिवा सौख्यें उतूं
शुभ्र अभ्रासारखा तू खालचा पाहीं ऋतू
रिक्ततेवांचून येथें मुक्ति नाहीं वेगळी
प्रीतिचा माते मळा ती आपुली गंगाजळी

२-८-७९

## प्रकाशाचे शब्द

ओलावती माझ्या मुखीं
तुझे प्रकाशाचे शब्द
लख्ख आंतल्या विजेनें
माझें उजळे प्रारब्ध

पिंडातच उघडतो
तुझ्या ब्रह्मांडाचा गाभा
आनंदाचें ऊर्ध्वतीर्थ
तुला न्हाणी पद्मनाभा

जागे नाभींतला स्पंद
कंठीं तोच होतो छंद
भृंग होऊन सेवितों
मी हा माझाच मरंद

चित्त चाकाटून लोपे
वाहे नकळतां वाणी
दृष्टीपुढें उचंबळे
फक्त प्रकाशाचें पाणी

३०-८-७९

## नामरूपावीण हरी

नामरूपावीण हरी नटे नामरूपीं
अकस्मात भेटे कधीं आपुले स्वरूपीं
नाहीं गोरा नाहीं काळा असा पांडुरंग
रंगातीत अंतरंगीं नित्य त्याचा संग
शोधूं जातां नाहीं तोच न शोधितां आहे
लक्ष नेत्र झांकूनही जगत्रय पाहे
अशा सोंगाड्याचा मला जडलासे छंद
आनंदी आनंद तोच गोविंद गोविंद

३–११–७९

# दीक्षा

दीक्षा दुधाची दिधलीस बाल्यीं
तैशी रसांचीहि किशोरकालीं
तारुण्यपक्षांत प्रकाशदीक्षा
वृद्धापकाळीं ज्वलनीं परीक्षा

ऐसें तुझें शिक्षण होय बापा
नेलेंस आतां परिपूर्ण ' मापा '
मी त्यांत झालों हवि आणि होता
आस्वादितों नित्य तुझी महत्ता

ध्याऊं किती गाऊं तुला अनंता
निस्तारिली तूं भवरोगचिंता
खेळीं तुझ्या रंगुनि पार गेलों
देहींच विश्रांत विदेह झालों

याहून येथें सुख काय आहे ?
देहींच पीयूष सदा प्रवाहे
त्याच्यांत प्रारब्ध खिरून गेलें
या चित्सुखें तूं मज धन्य केलें

१७–२–८०

# साऱ्या खिडक्या उघड्या टाकून

साऱ्या खिडक्या उघड्या टाकून
उजेड तेवढा आंत घेतों
क्वचित ऊन आलें तर
त्याच्या खणांत टक लावतों

चिमणाचिमणी गजांमधून
तणकाड्या आणीत असतात
पंख्यावरच्या वाटीमधें
नवें घरटें विणीत असतात

पडल्या पडल्या तासन् तास
त्यांचे चोज करीत असतों
पांगला माझा संसार आठवून
स्वतःलाच हंसत असतों

झोप लागून जाग येतांच
सांजपहाट उमगत नाहीं
जाग्रणाच्या पारण्यानंतर
भावलें होतें असेंच कांही

काळोखाच्या कातरवेळीं
समईशिवाय तेवते वात
'शुभं करोति' म्हणत मन
आपोआप जोडते हात

१७–२–८०

# सावधान

सावधान, सावधान

मदन फिरे धरुनि करें
सुमनचाप सुमनबाण. सावधान, सावधान

जरि न दिसे, तो न फसे
अचुक टिपी पंच प्राण. सावधान, सावधान

नर न म्हणे, सुर न म्हणे
टिपित जाय थोर सान. सावधान, सावधान

रुद्रासहि शर न चुके
झुकते विधिचीहि मान. सावधान, सावधान

परि न डरा, प्रीति करा
भरिल तोच नविन त्राण. सावधान, सावधान

तिजमुळेंच स्मर अनंग
हृदयसंग परम ज्ञान. सावधान, सावधान

युवजन हो, कविजन हो
गा गा रति–रमण गान
प्रीति जिथे रसरसते
स्मर तेथें सुखनिधान, सावधान, सावधान

११–६–१९८०

ठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

REFBK-0023640
REFBK-0023640

बोरकरांची कविता
ही स्वभावतःच ' अनुरागिणी ' आहे.

वैदिक ऋषींच्या, आर्ष महाकवींच्या आणि संत-महंतांच्या
वाणीच्या संस्कारांनी भारलेली ही कविता
रसिकांच्या हृदयांत
लीलया जीवनमंत्र जागवीत राहते;

आणि आपल्या अनावर स्नेहसमृद्धीने
विश्वचैतन्याला उराउरीं भेटताना
ती आत-बाहेर अशी बहरते की,
तिच्या गात्रोगात्रीं
लावण्याचे लक्ष लक्ष कळे फुलत राहतात.

विराग आणि अनुराग यांच्या संगमात
न्हालेल्या या ' अनुरागिणी 'च्या सहज शब्दांतून
तीर्थजळे झरतात;
तिच्या व्यथेतून कापुरारती पाजळते;
आणि तिच्या अश्रूंच्या पावित्र्यातून
नक्षत्रांची निरांजने उजळतात.

— रा. चिं. ढेरे